# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः29.11.2024** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

राज्यातील सत्तास्थापनेबाबत महायुतीच्या प्रमुख नेत्यांची नवी दिल्लीत अमित शहा यांच्यासमवेत बैठक

अदानी प्रकरणावरुन झालेल्या गदारोळानंतर संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

55व्या इफ्फीचा गोव्यात दिमाखदार सोहळ्यात समारोप; लंपन या मराठी वेबसिरीजला आणि दिग्दर्शक नवज्योत बांदिवडेकर यांना पुरस्कार

राष्ट्रीय पुस्तक न्यासाचं कार्यालय आता पुण्यात होणार

आणि

माऊलींच्या संजीवन समाधी सोहळ्याला लाखो वारकऱ्यांची उपस्थिती

**सत्ता स्थापना**

राज्यातल्या सत्तास्थापनेबाबत चर्चा करण्यासाठी काल रात्री मुख्यमंत्री आणि शिवसेना नेते एकनाथ शिंदे, भाजपा नेते देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रमुख अजित पवार यांनी नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. भाजपा अध्यक्ष जे पी नड्डा देखील यावेळी उपस्थित होते. भाजपाचं वरिष्ठ नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा जो निर्णय घेतील, तो आम्हाला पूर्णपणे मान्य असेल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या आधीच स्पष्ट केलं आहे. दरम्यान राज्यातील विधानसभा निवडणुकीत अमित

शहा यांनी दिलेलं पाठबळ आणि सहकार्याबद्दल भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. शहा यांनी पक्ष कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण केली; त्यांना प्रेरणा दिल्याचं फडणवीस यांनी आपल्या समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**संसद**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या कालच्या तिसऱ्या दिवशी गदारोळामुळे दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं.

राज्यसभेचं कामकाज सुरू झाल्यावर विरोधकांनी प्रथम अदानी समूह कथित लाच प्रकरणी चर्चा घेण्याची मागणी केली. मात्र, राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला. त्यानंतर विरोधकांनी घातलेल्या गदारोळामुळे कामकाज तहकूब  करावं लागलं.

लोकसभेत अदानी प्रकरणावरून विरोधकांनी हौद्यात उतरून जोरदार घोषणाबाजी केली. तुम्हाला बोलायची संधी मिळेल, पण कामकाज चालु द्या, अश्या सभापती ओम बिर्ला यांनी वारंवार केलेल्या आवाहनाला प्रतिसाद नं मिळाल्यामुळे कामकाज प्रथम दुपारपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. वक्फ सुधारणा विधेयक 2024 वरचा अहवाल सादर करण्याची या वर्षीपर्यंत असलेली मुदत 2025 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी ठेवला होता, तो लोकसभेत मान्य करण्यात आला.

**शपथ**

केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघातून पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी वड्रा यांनी काल लोकसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. तसंच नांदेड लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार रविंद्र चव्हाण यांनीही लोकसभेचे सदस्य म्हणून शपथ घेतली. चव्हाण यांनी मराठीतून शपथ घेतली.

**मोहोळ**

नवी मुंबई विमानतळाच्या नामांतराचा निर्णय अजून केंद्र सरकारनं घेतलेला नाही, अशी माहिती केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल लोकसभेत लेखी उत्तरात दिली. खासदार सुरेश म्हात्रे यांनी हा प्रश्न विचारला होता. नवी मुंबई विमानतळाला; लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई विमानतळ; असं नाव देण्याचा प्रस्ताव राज्य सरकारनं पाठवला आहे. या प्रस्तावासह विधिमंडळानं मंजूर केलेला ठराव सुद्धा आहे, अशी माहिती त्यांनी दिली. संबंधित मंत्रालयांशी चर्चा केल्यानंतर केंद्रीय मंत्रीमंडळ यासंदर्भात अंतिम निर्णय घेतं, असं त्यांनी सांगितलं.

**इफ्फी**

55 व्या अखिल भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थ इफ्फीचा समारोप काल गोव्यात एका दिमाखदार सोहळ्यात झाला. लंपन या मराठी वेबसिरीजनं उत्कृष्ट वेबसिरीजचा पुरस्कार पटकावला असून घरत गणपती या मराठी चित्रपटाचे दिग्दर्शक नवज्योत बांदिवडेकर यांना भारतीय चित्रपटांच्या विभागात पदार्पणातील दिग्दर्शनाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. इफ्फितील मानाचा सत्यजित रे जीवनगौरव पुरस्कार ऑस्ट्रेलियन दिग्दर्शक फिलीप नॉईस यांना प्राण करण्यात आला आहे. तर उत्कृष्ट चित्रपटाचा सुवर्णमयूर पुरस्कार सौले बिलुवाइट दिग्दर्शित टॉक्सिक या चित्रपटाला प्रदान करण्यात आला.

**पुणे पुस्तक महोत्सव**

पुणे पुस्तक महोत्सवाच्या माध्यमातून सुरू झालेली चळवळ केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर आगामी काळात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील आपली नाममुद्रा उमटवेल,

असा विश्वास आमदार चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे 14 ते 22 डिसेंबरपर्यंत पुण्यातल्या फर्ग्युसन महाविद्यालयात पुणे पुस्तक महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या पुस्तक महोत्सवाच्या मांडवाचं भूमिपूजन काल पाटील यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. पुण्यात राष्ट्रीय पुस्तक न्यासाचं कार्यालय लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती पाटील यांनी दिली. या कार्यालयासाठी पुण्यात भाडेतत्वावर जागा देण्यात आली असून लवकरच या कार्यालयाचं उद्घाटन होणार आहे. राष्ट्रीय पुस्तक न्यासाला मिळालेल्या जागेमध्ये जिजामाता कथाकथन केंद्र तसंच मोफत पुस्तक वाचनाची सोय अश्या सुविधा उपलब्ध असतील.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या पुण्याच्या कार्यालयाबाबत अधिक माहिती देताना न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे म्हणाले ---

**संजीवन समाधी**

संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींचा 728 वा संजीवन समाधी सोहळा काल आळंदीत भक्तीमय वातावरणात पार पडला. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांनी कार्तिक वैद्य त्रयोदशीला अलंकापुरीत समाधी घेतली होती. श्रीं ज्ञानेश्वर माउलींच्या संजीवन समाधी असलेल्या मुख्य मंदिरावर हेलिकॉप्टरनं पुष्पवृष्टी करण्यात आली. माऊलींच्या समाधीवर आरती  आणि दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधी मंदिरावर फुलांची सजावट करण्यात आली होती. तीन दिवसांपासून अलंकापुरी आळंदीत राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी दाखल झाले होते.

**महात्मा ज्योतिबा फुले**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीच्या निमित्तांनं काल त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आलं. ठिकठीकाणी आयोजित कार्यक्रमात महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेतर्फे

महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी दिला जाणारा ‘महात्मा फुले समता पुरस्कार’ यावर्षी प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक नागराज मंजुळे यांना परिषदेचे अध्यक्ष छगन भुजबळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. रुपये एक लाख, फुले पगडी, मानपत्र शाल आणि स्मृतीचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. समतेचा विचार आपल्याला पुढे घेवून जाण्याची गरज असल्याचं मत मंजुळे यांनी यावेळी व्यक्त केलं.

**राज्यमराठी चित्रपट पुरस्कार**

61 व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्काराच्या प्रवेशिकेला मुदतवाढ देण्यात आली असून निर्मात्यांनी 27 डिसेंबरपर्यंत प्रवेशिका सादर करण्याचं आवाहन महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी केलं आहे. दिनांक 1 जानेवारी 2023 ते 31 डिसेंबर 2024 या कालावधीत प्रमाणपत्र मिळालेल्या मराठी चित्रपटांच्या निर्मात्यांना या पुरस्कारासाठी अर्ज करता येणार आहे.

**बालविवाह-मुक्त**

केंद्र सरकारनं सुरु केलेल्या ‘बालविवाह मुक्त भारत’ अभियानां अंतर्गत धुळे जिल्ह्यात बालविवाह अधिक प्रमाणात होणाऱ्या 50 गावांकडे लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या गावांमध्ये बालविवाह प्रतिबंध कायदा, बालविवाहाचे तोटे, सामाजिक समस्या याविषयी जनजागृती करून बालविवाह शंभर टक्के थांबावे, अश्या प्रकारे कामाचं स्वरूप तयार करण्यात आलं आहे.

**राष्ट्रीय आरोग्य अभियान**

राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचं पथक बुधवारी अकोला जिल्ह्यात दाखल झालं.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात थंडीचा कडाका वाढला आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा  आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय घट झाली आहे. तर कोकणात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली आहे. काल राज्यात सर्वात कमी, 9 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सियस किमान तापमानाची अहिल्यानगरमध्ये झाली. येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**